# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **12/06/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. कारंजा शहर हद्दीतील दारव्हा रोडवरील घरासमोरून चोरी गेलेल्या चारचाकी वाहनासह आरोपीस ताब्यात घेण्यात कारंजा पोलिसांना यश आले आहे.

## चोरीच्या वाहनासह आरोपीस घेतले ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ■ येथील अब्दुल माजीद मोहम्मंद खैरू ४० रा. दारव्हा वेश जवळ कारंजा यांनी १ जुन रोजी शहर पोलीस स्टेशन येथे चारचाकी वाहन चोरीची तक्रार दिली होती पोलिसांनी १० जुन रोजी वाहनासह आरोपीस ताब्यात घेवून अटक केली आहे. प्रकरणात सहभागी इतर आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

या बाबतचे वृत्त असे की कारंजा येथील अब्दुल माजीद यांनी रिपोर्ट दिला की, त्याचा भाऊ अब्दुल समद यांने चार महीन्यापुर्वी टाटा सफारी चार चाकी गाडी क्रमांक एम.एच.१२ डी.एस ०६६६ कमांकाची सिल्वर ग्रीन रंगाची किंमत अंदाजे १,००,०००/-रूपये २४ मे रोजी दारव्हा येथे जावुन २५ मे रोजी सकाळी च्या सुमारास कारंजा येथे दारव्हा रोड स्मशान भुमी जवळील माझे प्लॉटवर उभी करून मी माझे घरी जाऊन झोपलो २५ मे रोजी सकाळी मी उठुन मी लावलेली गाडीची पाहणी केली असता मला सदरची गाडी दिसुन न आल्याने मी भावाना शहरातील लोकांना गाडी बाबत विचारपुस करून शोध घेतला मिळुन आली नाही. माझ्या भावाची गाडी १)



मोहसीन पठान रा. भारतीपुरा कारंजा परवेज खान फिरोज खान रा. दारव्हा वेश कारंजा यांनीच माझ्या भावाचे नावाने असलेली गाडी क्रमांक एम.एच.१२ डी.एस ०६६६ ही चोरून नेली असा संशय होता.अशा फिर्यादी वरून पो.स्टे.ला. कलम ३७९ भा.द.वि.प्रमाणे गुन्हा दाखल केला सदर गुन्हयाचा तपास पोलीस अधिक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. आधारसिंग एस. सोनोने, प्रशात जाधव, चरण चव्हाण, ना.पो.कॉ/अनिल राठोड, फिरोज खान, रोहन तायडे पो.स्टे. कारंजा शहर नी सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील प्रमुख आरोपी नामे परवेज खान फिरोज खान य २० वर्ष रा. दारव्हा वेश कारंजा यास अटक करण्यात आली. आणखी तिन आरोपी निष्पण झाले असुन आरोपींचा शोध सुरू आहे.(ता.प्र.)